# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

*(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)*

**परिपत्रक क्र. 115/२०१८**

दिनांक २२ जून, २०१८ रोजीच्या परिपत्रक क्र. ९५/२०१८ अन्वये विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये अध्यापन सहायक (Teaching Associate) या पदाऐवजी सहायक प्राध्यापक (अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रम) (Assistant Professor [Teacher Training Programme]) नेमण्यासंदर्भांत सर्व शैक्षणिक विभागप्रमुखांना कळविण्यात आले होते.

असे निदर्शनास आले आहे की, सदर योजना लागु करते वेळी, अनेक विभागांची अध्यापक सहायक ही पदे भरण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आलेली होती. ही बाब विचारात घेता सर्व शैक्षणिक विभागप्रमुखांना मा. कुलगुरू यांच्या प्राप्त आदेशानुसार या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सहायक प्राध्यापक (अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रम) (Assistant Professor [Teacher Training Programme]) नेमण्यासंदर्भांत निर्माण झालेल्या अडचणी विचारात घेता तसेच दिनांक ०१ जुलै, २०१८ पासून शैक्षणिक विभागांचे वर्ग सुरु झालेले असल्यामुळे विभागांची तातडीची निकड लक्षात घेता स्थगित केलेली अध्यापन सहायक (Teaching Associate) योजना या शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता सुरू ठेवण्यात येत आहे. सबब यापूर्वी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता ज्या शैक्षणिक विभागांना अध्यापन सहायक (Teaching Associate) ही पदे भरण्याची प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे, अशा विभागांनी अध्यापन सहायकांची पदे भरण्याबाबतची पुढील प्रक्रिया पुर्वीप्रमाणेच आपल्या स्तरावर करावी.

सहायक प्राध्यापक (अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रम) (Assistant Professor [Teacher Training Programme]) नेमण्याची योजना स्थगित करण्यात येत असल्याने दिनांक २२ जून, २०१८ रोजीचे परिपत्रक क्र. ९५/२०१८ रद्द समजण्यात यावे.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
जा. क्र. एटी/प्रच कोडी/1035)
दिनांकः 09/07/ जुलै, २०१८ )

9/7/18
(डॉ. अरविंद डी. शाळीग्राम)
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**
मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग

D:\Shekhar Office\2018\Marathi\Circular.doc